# कापड बाजार किंवा दुकाने असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना १९७१

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ६(१) मधील तरतुदीनुसार तयार केलेली योजना.

## अनुक्रमणिका


| खंड | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| ०१ | शिर्षक | ३ |
| ०२ | योजनेची उद्दीष्टे व प्रयुक्ती | ३ |
| ०३ | योजनेचा प्रारंभ | ५ |
| ०४ | व्याख्या | ६ |
| ०५ | मंडळाचे सचिव, कार्मिक अधिकारी व इतर सेवक नियुक्ती | ७ |
| ०६ | मंडळाची कार्य | ७ |
| ०७ | वार्षिक अंदाजपत्रक | १२ |
| ०८ | अध्यक्षांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य | १२ |
| ०९ | सचिवांची कार्य | १३ |
| १० | कार्मिक अधिकाऱ्याचे कार्य | १५ |
| ११ | नोंदवह्या ठेवणे | १५ |
| १२ आणि १३ | वगळण्यात आले | १६ |
| १४ | मालकांची नोंदणी | १६ |
| १५ | विद्यमान व नविन कामगारांची नोंदणी | १७ |
| १६ | कामगारांची बढती व बदली | १७ |
| १७ | वैद्यकीय तपासणी | १८ |
| १८ | नोंदणी शुल्क (कामगार नोंदणी/मालक नोंदणी) | १८ |
| १९ | कार्ड पुरवणे | १९ |
| २० | नोंदणी झालेल्या कामगारांचा सेवा अभिलेख | १९ |
| २१ | नोंदणी झालेल्या मालकांचे अभिलेख पत्रक | १९ |

| | | |
|---|---|---|
| २२ | कार्ड परत करणे | १९ |
| २३ | वगळण्यात आले | २० |
| २४ | मासिक कामगारांचे सेवायोजन | २० |
| २५ आणि २६ | वगळण्यात आले | २० |
| २७ | सुट्टया | २० |
| २८ | वगळण्यात आले | २० |
| २९ | नोंदणी झालेल्या कामगारांवरील बंधने | २१ |
| ३० | नोंदणी झालेल्या मालकांवरील निर्बंध | २१ |
| ३१ | नोकरीवरील निर्बंध | २२ |
| ३२ | ही योजना लागू असणे बंद होईल ती परिस्थिती | २३ |
| ३३ | कामगाराची मजुरी भत्ते व सेवेच्या अन्यशर्ती | २३ |
| ३४ | नोंदित कामगारांना रोजगार आणि इतर भत्त्याचे संवितरण | २५ |
| ३५ | शिस्तभंगाची कारवाई | २५ |
| ३६ | अध्यक्षांच्या शिस्तविषयक विशेष शक्ती | २७ |
| ३७ | रोजगाराची समाप्ती | २८ |
| ३८ | कामगारांनी अपील करणे | २८ |
| ३९ आणि ४० | वगळण्यात आले | २९ |
| ४१ | विविक्षीत अपिलाच्या बाबतीत आदेशाला स्थगिती देणे | ३० |
| ४२ | योजना राबविण्याचा खर्च आणि नोंदित कामगारांना सुखसोयी व लाभ यासाठीच्या तरतुदी | ३० |
| ४३ | भविष्य निर्वाह निधी आणि उपदान | ३१ |
| ४४ | दंड | ३२ |

# उद्योग व कामगार विभाग

सचिवालय, मुंबई– ३२, ११ मार्च, १९७१

## महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९

क्रमांक युडब्ल्युए १४७१(जीएल)/१०२३०७/-कामगार -४

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ या अधिनियमाच्या कलम ४च्या पोट-कलम (१) अंतर्गत दिलेल्या अधिकारांद्वारे (Mah. xxx of १९६९) आणि त्याद्वारे प्राप्त झालेल्या इतर अधिकारांद्वारे, महाराष्ट्र सरकार, सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर कापड बाजार आणि दुकाने जी माल चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, किंवा इतर काम ज्यात या कामांशी संबंधित तयारी किंवा याकामांतर्गत कामांचा समावेश होतो, यातील रोजगारासाठी, या योजनेला जोडलेल्या परिशिष्टातील कार्यक्षेत्रासाठी खालील योजना तयार करत आहे. ही योजना कलम ४ च्या पोटकलम (१) अंतर्गत पूर्वी याची प्रसिद्ध केलेली आहे. ती अशी:

## योजना

**कापड बाजार किंवा दुकाने असंघटित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९७१**

**१. शीर्षक :**

ही योजना कापड बाजार किंवा दुकाने- असंघटीत कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याणकारी) योजना, १९७१ असे म्हणता येईल.

२. **उद्दिष्टे आणि प्रयुक्ती -**

१) **उद्दिष्टे** – या योजनेची उद्दिष्टे खालील ठिकाणी कार्यरत असलेल्या कामगारांचा पुरेसा पुरवठा आणि असंघटीत कामगारांचा सुयोग्य वापर होतो याची खात्री करणे.

(अ) कापड बाजार अथवा दुकानांशी संलग्न माल चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, त्याची ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, शिवणे, वर्गीकरण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामाच्या पूर्व तयारीची किंवा अनुषंगिक कामे धरून कामांचा समावेश होतो; आणि

(ब) बाजार आणि कारखाने आणि इतर आस्थापनातील कामांशी संबंधित माल/सामान चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, शिवणे, वर्गीकरण करणे, स्वच्छ करणे की,

(i) सुती कापडासकट सर्व प्रकारचे कापड जसे की, लोकर, रेशीम (संपूर्ण किंवा काही भाग कृत्रिम, संयोग क्रियेद्वारे बनलेले किंवा मानवनिर्मित असलेले) आणि होजियरी आणि;

(ii) सुती धाग्यासकट सर्व प्रकारचे धागे जसे की, लोकर, रेशीम (संपूर्ण किंवा काही भाग कृत्रिम, संयोग क्रियेद्वारे बनलेले किंवा मानवनिर्मित धागे) किंवा या कामांशी संबंधित तयारी किंवा

याकामांतर्गत कामांचा समावेश होतो अशा ठिकाणी कार्यरत असलेले कामगार अधिनियमाच्या परिशिष्टातील नोंद ५ मध्ये संदर्भ आहे. याशिवाय या योजनेच्या उद्दिष्टांमध्ये कामाची गुणवत्ता उंचावणे तसेच या प्रकारात मोडणाऱ्या कामगारांसाठी असलेल्या अटी आणि शर्ती यांची सुयोग्य तरतूद आणि त्यांच्या एकूण कल्याणासाठी योजना बनवणे यांचा समावेश होतो.

**(२) प्रयुक्ती** २ -

ही योजना बृहन्मुंबई, ठाणे जिल्हा आणि रायगड जिल्हा** येथील खालील कामगारांना लागू होते.**

(अ)[१] या प्रक्रियांशी संलग्न कापड बाजार अथवा दुकाने येथे नोकरीस असलेले नोंदणीकृत कामगार- माल चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, शिवणे, वर्गवारी करणे, साफ करणे किंवा इतर काम ज्यात या कामांशी संबंधित तयारी किंवा याकामांतर्गत कामांचा समावेश होतो; आणि

(ब)[२] खालील गोष्टींशी संबंधित माल/सामान चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, शिवणे, वर्गवारी करणे, साफ करणे या कामांशी संबंधित कामांशी संलग्न बाजार आणि कारखाने आणि इतर आस्थापना येथे नोकरीस असलेले नोंदणीकृत कामगार —

(i) सुती कापडासकट सर्व प्रकारचे कापड जसे की, लोकर, रेशीम (संपूर्ण किंवा काही भाग कृत्रिम, संयोग क्रियेद्वारे बनलेले किंवा मानवनिर्मित असलेले) आणि होजियरी आणि;

(ii) सुती धाग्यासकट सर्व प्रकारचे धागे जसे की, लोकर, रेशीम (संपूर्ण किंवा काही भाग कृत्रिम, संयोग क्रियेद्वारे बनलेले किंवा मानवनिर्मित धागे) किंवा इतर काम ज्यात या कामांशी संबंधित तयारी किंवा याकामांतर्गत कामांचा समावेश होतो अशा ठिकाणी कार्यरत असलेले कामगार कायद्याच्या परिशिष्टातील नोंद ५ मध्ये संदर्भ आहे आणि कामाच्या कार्यक्षम कामगीरीसाठी व सामान्यत: अशा कामगाराच्या रोजगाराच्या अटी

आणि शर्तीसाठी चांगल्या तरतुदी आणि त्यांच्या कल्याणासाठी तरतुदी कराव्यात.

क) ३ नोंदित मालक अशा कामगारांचा समावेश करेल

---

१) संपूर्ण खंड -२ अतिसामान्य शासन अधिसुचना क्र. युडब्ल्युए १२७२/१५४८५५/कामगार-४ दि.१५/१२/१९७२ अन्वये बदली करण्यात आला.

२) खंड २ मध्ये- महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र. युडब्ल्युए १४७३/१७७२१९/कामगार ४ दि.१५/०६/१९७३ अन्वये 'मापन' हा शब्दानंतर जिथे जिथे ते येथे तेथे तेथे भरणे शिवणे, वर्गवारी करणे, साफ करणे हे शब्द समाविष्ट केले आहेत. १ आणि २- खंड २ मध्ये- २ मधील (अ) आणि (ब) १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.(एक्सएल )अन्वये नियुक्त कामगार या शब्दासाठी जेथे ते आढळतात तेथे 'नोंदणीकृत नियुक्त कामगार' हे शब्द बदलले आहेत.*खंड २ मध्ये – (२) शासन अधिसुचना क्र.युडब्ल्युए-१०७६/प्र.क्र.-१११०/कामगार-५ दि.०१ जून १९७९ अन्वये 'बृहन्मुंबई' या शब्दानंतर 'आणि ठाणे जिल्हा' जोडला गेला. दि.१५ जुलै १९७९ पासून योजना ठाणे जिल्ह्यासाठी लागू झाली.३) खंड २ मध्ये- (२) नंतरचा मुद्दा (ब), मुद्दा (क) १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.(एक्सएल )अन्वये समाविष्ट करण्यात आले.**खंड २ मध्ये -महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र. युडब्ल्युए-१३८७/प्र.क्र.-११५८७/कामगार-५ दि.१४ मार्च १९८८ अन्वये 'आणि ठाणे जिल्हा' शब्दात बदल करून 'ठाणे जिल्हा आणि रायगड जिल्हा' असा शब्दात बदल करण्यात आला.

---

३. **प्रारंभ:**

i) या योजनेतील खंड १४ आणि १५ हे दिनांक १ मे, १९७१ पासून लागू होईल.

ii) उर्वरीत खंड १ जून, १९७१ पासून अमलात येतील,

iii) या योजनेतील खंड १४ आणि १५ कापड बाजार अथवा दुकाने आणि कारखाने आणि इतर आस्थापनातील नोकरीत भरणे, शिवणे, वर्गीकरण करणे साफ करण्याशी संबंधित दि.१६ जुलै १९७३ पासून अमलात येतील.

iv)२ या योजनेतील उर्वरीत खंड कापड बाजार अथवा दुकानांशी संलग्न माल चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, त्याची ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, शिवणे, वर्गीकरण करणे, स्वच्छ करणे संबंधित दि.१६ ऑगस्ट १९७३ पासून अमलात येतील.

---

१ आणि २. खंड-३ मध्ये महाराष्ट्र शासन अधिसूचना, क्र. युडब्ल्युए १४७३/१७७२१९/कामगार-४अन्वये मुद्दा (iii) आणि (iv) समाविष्ट करण्यात आले आहेत.

---

४. **व्याख्या:**

अे)"अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ होय.

बी) "मंडळ" म्हणजे या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये स्थापित केलेले,बृहन्मुंबई साठीचे कापड बाजार आणि दुकाने मंडळ असा आहे;

सी) "अध्यक्ष" म्हणजे मंडळाचा अध्यक्ष असा आहे;

डी) 3"नोंदणीकृत मालक" म्हणजे असा मालक ज्याचे नाव सद्य:स्थितीत आत्तापुरते मालकांच्या नोंदपुस्तकात नोंदविलेले आहे;

इ) "मासिक कामगार" म्हणजे मालकाकडून किंवा मालकांच्या समूहाने महिन्याच्या करारावर नोकरीस/कामास ठेवलेला कामगार होय;

एफ) समुह कामगार म्हणजे मंडळाकडून ठेवण्यात आलेली कामगारांची यादी, जे मासिक कामगार नाहीत.

जी) "समूह" म्हणजे मंडळाद्वारे ठेवण्यात आलेली कामगारांची यादी ज्यात मासिक कामगारांचा समावेश होत नाही;

एच)१ "नोंदणीकृत कामगार" म्हणजे समुह कामगारांच्या नोंदवहीत किंवा मासिक कामगारांच्या नोंदवहीत त्यावेळेपुरती ज्याच्या नावाची नोंद केली आहे असा कामगार

आय) "मालकांची नोंदपुस्तक" म्हणजे या योजनेअंतर्गत तयार केलेली मालकांची नोंदवही

जे) "कामगारांची नोंदवही" म्हणजे या योजनेअंतर्गत ठेवण्यात आलेली कामगारांची नोंदवही

के) "सचिव" म्हणजे मंडळाचे सचिव;एल) "कार्मिक अधिकारी" म्हणजे मंडळाने खंड ५ अन्वये नियुक्त केलेला "कार्मिक अधिकारी" होय;

(एम) "नियम" म्हणजे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) नियम, १९७०

(एन) "आठवडा" म्हणजे शनिवारी मध्यरात्रीपासून सुरू होणारा आणि त्यापुढील शनिवारच्या मध्यरात्री संपणारा असा सात दिवसांचा कालावधी

(ओ) [२]या योजनेत वापरले गेलेले परंतु ज्यांची व्याख्या केलेली नाही असे शब्द आणि अभिव्यक्ती यांना अधिनियमामध्ये अनुक्रमे प्रदान केलेला अर्थच लागू होईल."

३ खंड-4 मध्ये - महाराष्ट्र शासन अधिसूचना कु. युडब्लूए 9- १४७१(जीएल)१७३ कामगार- ४ दि. २९/०५/७३ अन्वये (ड ) बदली करण्यात आला

१ शासन अधिसूचना क्र.युडब्लूए - १४७१ (जीएल) १७३६४१ / कामगार-४ दि.२९/०५/७३ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

---

## ५. मंडळाचे सचिव, कार्मिक अधिकारी आणि मंडळाचे इतर सेवक

मंडळास योग्य वाटणाऱ्या अटी आणि शर्तीअंतर्गत मंडळ, एक सचिव, एक कार्मिक अधिकारी आणि अन्य इतर अधिकारी व सेवक यांची नियुक्ती करील.

परंतू मंडळाला, भत्ता वगळून ज्या पदाचे कमाल वेतन दरमहा रू. ५००/- आणि त्यापेक्षा अधिक आहे असे पद निर्माण करता येणार नाही आणि राज्य शासनाच्या पूर्व मंजुरी शिवाय कोणतीही नेमणूक करता येणार नाही.

परंतू, आणखी असे की, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा एखाद्या रजेच्या कालावधीमधील रिक्त पदांवरील कोणत्याही नेमणूकीसाठी राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

## ६. मंडळाची कार्ये

१) मंडळाला योजनेच्या खंड २ मध्ये उद्युक्त केलेली या योजनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, त्याला इष्ट वाटतील असे उपाय योजता येतील आणि त्यात खालील बाबींवरील उपायांचा समावेश असेल.

i ) कामाची शीघ्र उलाढाल सुकर करण्याच्या प्रयोजनार्थ, नोंदित कामगारांचा पुरेसा पुरवठा होण्याची आणि त्यांचा पूर्णपणे व यथोचित उपयोग होण्याची खात्री करू घेणे.

ii) या योजने अंतर्गत नेमणूक झाल्यानंतर कामगारांचा प्रवेश आणि योजनेतून निर्गमन याचे नियमन करणे तसेच नोंदणीकृत मालकांच्या समूहामध्ये नोंदणीकृत कामगारांना नेमणे.१ रंतू "जर योजना लागू झाली असेल त्या दिवशी कामगारांची टोळी एखाद्या मालकाकडे काम करत असेल तर ती टोळी योजनेंअंतर्गत नोंदणी झाल्यानंतर त्याच मालकासाठी नेमून दिली जाईल आणि ती टोळी त्याच्यासाठीच काम करू शकेल. अपवाद फक्त जेव्हा मंडळाच्या अनुमतीने काही बदल झाले असतील i) अशा मालकच्या विनंतीवरून किंवा ii) टोळीतील एखाद्या कामगाराच्या किंवा सर्व कामगारांच्या विनंतीवरून."

iii) वेळोवेळी नोंदणी झालेल्या कामगारांची संख्या ठरविणे, नोंदवहीत किंवा इतर ठिकाणी नोंदल्या गेलेल्या नोंदणीकृत कामगारांचा आढावा घेणे तसेच नोंदणीकृत कामगारांची संख्या वाढविणे किंवा कमी करणे, वा नियमन करणे.

iv) मालकांच्या नोंदवहया ठेवणे, त्याचे समायोजन करणे, त्या सुस्थितीत ठेवणे, त्याची कोणत्याही मालकाच्या नावाची नोंद करणे किंवा पुर्ननोंद करणे आणि आवश्यक असे अशा परिस्थितीत या योजनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नोंदीत मालकाचे नाव नोंदवहीतून काढून टाकणे.

v) कामगारांसाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही नोंदवहया किंवा अभिलेख ठेवणे तसेच जे कामासाठी तात्पुरते उपलब्ध नाहीत अशा आणि मंडळाकडून ज्यांच्या अनुपस्थितीस मान्यता मिळालेली आहे अशा कामगारांच्या नोंदवह्या व अभिलेख ठेवणे त्यांचे समायोजन करणे व ते सुस्थितीत राखणे आणि आवश्यक असेल अशा परिस्थितीत, कोणत्याही नोंदणी झालेल्या कामगारांचे नांव, एकतर त्याच्या स्वत:च्या विनंतीवरुन किंवा या योजनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नोंदवहीतून किंवा अभिलेखातून काढून टाकणे.

vi) मंडळाने ठरविले असेल अशा गटांमध्ये सर्व नोंदणीकृत कामगारांचे गट करणे किंवा त्यांचे पुनर्गट तयार करणे आणि एखाद्या नोंदणी झालेल्या कामगाराच्या अर्जावर किंवा अन्य प्रकारे कोणत्याही कामगारांच्या गटाचे पुनर्विलोकन करणे.

vi -a) टोळयांना विविध समूहात नव्याने एकत्र करणे, टोळीत कुठल्याही कामगाराला नव्याने दाखल करायचे असल्यास किंवा टोळीची रचना बदलायची असल्यास ती मुकादमाशी आणि टोळीतील कामगारांशी चर्चा करूनच बदलणे. टोळयांना विविध समूहात नव्याने एकत्र करताना कामगार आणि त्यांना नोकरी देणारे मालक यांचे हितसंबंध विचारात घेतले जावेत; १

vi-b) टोळीतील मुकादमात कुठलाही बदल करायचा झाल्यास तो त्या टोळीतील कामगार आणि त्यांना नोकरी देणारे मालक यांच्याशी चर्चा करून केला जावा; २

vii) निधीच्या उपलब्धतेस अधीन राहून, या योजनेखेरीज अन्य प्रकारे तशी तरतुद नसेल तर वैद्यकीय सेवांच्या समावेशासह, नोंदीत कामगारांच्या कल्याणासाठी तरतुद करणे.

viii)या योजनेच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे संदर्भात नोंदीत मालकांकडून त्यांचे अंशदान वेतन, लेव्ही (करवसुली) आणि या योजनेखालील इतर कोणतेही अंशदाने वसुल करणे.

xi) निधीच्या उपलब्धतेस अधीन राहून, या योजनेखेरीज अन्य प्रकारे तशी तरतुद नसेल तर , कामाच्या ठिकाणी कामावर असलेल्या कामगारांसाठी आरोग्य व सेवा सुरक्षिततेचे उपाय यासाठी तरतुद करणे.

x) कामगार कल्याण निधी उभारणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे आणि अशा निधीची, निधीच्या नियमांनुसार उभारणी होते तेव्हा सर्व नोंदणी झालेल्या मालकांकडून निधीचे अंशदान वसूल करणे.

xi) समुहातील नोंदणी झालेल्या कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी आणि उपदान निधीची उभारणी करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे.

xii) निधींच्या उपलब्धतेस अधीन राहून, नोंदणी झालेल्या कामगारांसाठी आणि मंडळाच्या कर्मचारी वर्गासाठी स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना कर्ज देण्याच्या मार्गाने सहाय्य करणे.

२) या योजनेच्या प्रयोजनार्थ आणि योजनेच्या तरतुदीस अधीन राहून मंडळाकडे निधी असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता मंडळाच्या ताब्यात असतील त्याच्याकडून त्यासंबंधातील उपयोजन केले जाईल.

३)मंडळाकडे स्वतःचा निधी असेल व मंडळ स्वतः तो निधी सांभाळेल ज्यात पुढील बाबींचा पैसा जमा करण्यात येईल.

अ) राज्य शासनाकडून मंडळाला मिळणारा सर्व पैसा.

ब) या योजने अन्वये मंडळाला मिळणारे सर्व शुल्क, मजूरी व लेव्ही.

क) मालमत्ता आणि इतर मत्ता यांची विक्री व त्यांची विल्हेवाट लावण्याच्या मागील मंडळाला मिळणारा सर्व पैसा..

ड) रोखे व ठेवींच्या गुंतवणूकीवरील व्याज, भाडी आणि कोणत्याही अन्य रीतीने किंवा कोणत्याही अन्य मार्गाने मंडळाला मिळणारे सर्व पैसे.

४) निधींच्या स्वरुपातील सर्व पैसा, भारतीय स्टेट बँक किंवा भारतीय रिझर्व्ह बँक कि कोणतीही राष्ट्रीयकृत अनुसूचित बँक १ किंवा कोणतीही सहकारी बँक यामध्ये चालू किंवा ठेव खात्यात ठेवण्यात येईल किंवा मंडळाकडून मान्यता देण्यात येईल अशा रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल. अशा खात्यांवरच सर्व व्यवहार, मंडळाकडून प्राधिकृत करण्यात मंडळज्ञच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येतील.

परंतू मंडळ, त्याच्या आवश्यकतेनुसार रू.१०००/- पेक्षा अधिक नाही अशी रक्कम स्वत: जवळ ठेऊ शकेल.

५) मंडळ राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने खुल्या बाजारातून किंवा अन्यथा योग्य त्या साधनसंपत्तीची तरतुद करण्याच्या हेतूने कर्जाऊ पैसा घेऊ शकेल.

६) मंडळाने ज्यांच्याबरोबर कोणताही व्यवहार केला आहे अशा कोणत्याही व्यक्ती प्राधिकरणे किंवा आस्थापना यांच्याकडून त्याला योग्य वाटतील अशा शर्तीवर मंडळ ठेवी स्विकारू शकेल.

७) मंडळ या योजनेत उपबंधित केले असेल त्याप्रमाणे राखीय आणि इतर नामनिर्देशीत / नामाभिधानीत निधींची तरतुद करील.

८) मंडळाला योजनेअन्वये प्राधिकृत केलेल्या प्रयोजनांसाठी त्याला योग्य वाटेल अशी रक्कम मंडळाच्या सर्वसाधारण निधीतून किंवा राखीव आणि यथास्थिती इतर निधीमधून खर्च करण्याचा प्राधिकार असेल.

९) मंडळ ही योजना चालविण्याच्या खर्चाचा आणि या योजनेखालील सर्व जमा व खर्चाचा योग्य तो लेखा ठेवण्याची व्यवस्था करील.

१०) मंडळाने राज्य शासनाला सादर करावयाचे आहे.

अ)प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल नंतर शक्यतो लवकर आणि ३१ ऑक्टोबर पूर्वी, ३० मार्च रोजी समाप्त होणा-या मागील वर्षातील योजनेच्या कामांचा वार्षिक अहवाल तसेच लेखापरिक्षित लाळेबंद, आणि

ब) मंडळाच्या बैठकीच्या कार्यवृत्तांच्या प्रती, राज्य शासनाला सादर करील.

११) मंडळाने

१) नोंदणी करावयाच्या कामगारांची संख्या निश्चित करील. १

२) नोंदवही व अपेक्षित गरजांचा नियतकालिक आढावा घेतल्यानंतर, आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी नोंदवहीतील कोणत्याही प्रवर्गातील कामगारांच्या २ संख्येत वाढ करील किंवा घट करील३. परंतू जर ५० पेक्षा अधिक मालकांची लिखित सुचनेद्वारे कामगारांची कमतरता असल्याचे कळविल्यास मंडळ तात्काळ पुनारवलोकन करेल.

३) विशिष्ट कालावधीसाठी कोणत्याही प्रवर्गातील कामगारांच्या विनिर्दिष्ट संख्येतील ४ तात्पुरत्या नोंदणीस मंजूरी देईल. परंतू अशाप्रकारे कामगारांना एखाद्या टोळीत तात्पुरते सहभागी करून घेताना त्या टोळीतील मुकादमाशी आणि इतर कामगारांशी सहमत करून याबाबत निर्णय घेतला जाईल. तसेच अशा तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक झालेल्या कामगारांची जर सहा महिने एका टोळीत काम केले, तर त्या टोळीत कायम स्वरूपी सामावून घेतले जाईल.

४) योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असतील असे नमुने, अभिलेख नोंदवहया, समझोते आणि इतर तत्सम बाबी तयार करील.

५) नोंदणीकृत कामगारांच्या सेवानिवृत्तीच्या वयासह त्यांची मजुरी, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती निश्चित करील.

६) खंड ४२ (१) अन्वये लेव्हीचे अधिभाराचे दर निश्चित करील.

७) खंड २८अन्वये समित्या नियुक्त करील, रद्द करील किंवा त्यांची पुर्नरचना करील.

८) १ वगळण्यात आले.

९) खंड ५ च्या तरतुदीस अधीन राहून सचिव, कार्मिक अधिकारी आणि मंडळातील इतर कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती करील.

१०) योजनेतील कोणत्याही फेरबदलाबाबत राज्य शासनास शिफारस करील.

११) नोंदीत मालक आणि नोंदीत कामगार यांच्यामधील विवादांबाबत समझोता करील.

१२) कामगारांचे श्रमिक उपज आणि कामाची उलाढाल याबाबतच्या सांख्यिकीबाबत चर्चा करील आणि त्याबाबतचे अभिप्राय व निदेशांची नोंद करील.

१३) २ वगळण्यात आले.

---

उपखंड - 1 मध्ये शासन अधिसुचना क्र. युडब्लूए - १४७१ (जीएल) १७३६४१ / कामगार-४ दि. २९/०५/१९७३ तरतूद समाविष्ट करण्यात आली.

१आणि२- महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये उपखंड १ (vi), (v)- अ) आणि (vi ब) नंतर समावेश करण्यात आला.

१) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.युडब्लूए -१०७६ /प्र.क्र.१११० कामगार-५ दि.०१ जून १९७९ अन्वये खंड ६(१) मध्ये (मुद्दा(XI) मुद्दा (XII) समावेश करण्यात आला

1) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये उपखंड ४ मध्ये शेड्यूल बँक शब्दानंतर किंवा कोणतीही सहकारी बँक शब्दांचा समावेश करण्यात आला

1) खंड (११)मधील 'विविध श्रेणी अंतर्गत' शब्द वगळण्यात आले आणि

२) मुद्दा (i) मध्ये 'कोणत्याही श्रेणीतील' वगळण्यात आले आणि

३) मुद्दा (ii) नंतर तरतुदीचा समावेश करण्यात आला आणि

4) शासन अधिसुचना क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये मुद्दा (III) मध्ये तरतूदी समाविष्ट करण्यात आल्या.

१) १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ६ च्या उपखंड ११ मधील मुद्दा (VIII) वगळण्यात आला.

२) १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ६ च्या उपखंड ११ (मुद्दा (xii) वगळण्यात आला.

---

**७. वार्षिक अंदाज पत्रक -**

अध्यक्ष प्रत्येक वर्षी फेब्रुवारी, महिना संपण्यापूर्वी बोलविण्यात येणा-या एखाद्या विशेष बैठकीत, एप्रिलच्या पहिल्या दिवसापासून सुरु होणा-या अशा आगामी वर्षासाठी असलेला योजनेचा वार्षिक अर्थसंकल्प मंडळ वेळोवेळी विनिर्देशीत करील अशा तपशिलांसह आणि प्रपत्रात मंडळापुढे ठेवील. मंडळ त्याला अशा सादर केलेल्या अंदाजपत्रकावर विचार करील आणि ते सादर केल्यापासून चार आठवडयाच्या आत ..एकतर त्यात फेरफार न करता किंवा त्याला योग्य वाटेल अशा फेरफारांच्या अधीनतेने ते मंजूर करील.

**८. अध्यक्षांच्या जबाबदा-या आणि कर्तव्ये –**

मंडळाची कार्ये आणि अधिकार यास बाधा न आणता, अध्यक्ष सामान्यपणे योजनेच्या समाधानकारक अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल आणि अध्यक्षाला मंडळाच्या निदेशाच्या अधीनतेने मंडळाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे आणि विशेषतः खालील बाबींच्या संबंधातील अधिकार असतील, ते असे -

अ) कामगारांच्या नोंदवह्यांच्या समायोजनाच्या संबंधात मंडळाच्या निर्णयाचे शीघ्रतेने पालन झाल्याबाबत खात्री करुन घेणे.

बी) कामगारांच्या तात्पुरत्या नोंदणीची मंजूरी विनाविलंब दिली आहे याबाबत खात्री करून घेणे.

सी) योजनेच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

डी) जर काही नियमबाह्य बाबी त्यास आढळल्या असतील किंवा त्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या असतील तर त्यावर योग्य ती उपाययोजना करणे.

इ) कामगारांच्या बदल्या १ व बढत्यांच्या संबंधात या योजनेच्या तरतुदींचे पालन केले असल्याबाबत खात्री करून घेणे

एफ) आवश्यक असल्यास वैद्यकिय मंडळ गठीत करणे.

जी) मालकांच्या नोंदणीसाठी योजनेत असलेल्या शर्तीचे त्यांच्याकडून अनुपालन होत आहे याबद्दल खात्री करुन घेणे.

एच) कामगारांच्या श्रमिक उपज बाबतची योग्य आकडेवारी संकलित केली आहे आणि मंडळाची इच्छा असेल अशा कालांतराने ती योग्य शेरे व स्पष्टीकरणांसह मंडळापुढे सादर केली आहे याबद्दल खात्री करुन घेणे.

आय) मंडळाने तयार केलेली सर्व प्रपत्रे, नोंदवह्या, विवरणे आणि दस्तऐवज योग्यरीतीने ठेवण्यात येतात याबाबत खात्री करुन घेणे.

जे) (i) भत्ते वगळून ज्याचे कमाल वेतन दरमहा रु. ५००/- पेक्षा कमी आहे अशा पदाच्या निर्मितीस मंजूरी देणे आणि अशा पदांवर नेमणुका करणे.

(ii) भत्ते वगळून ज्याचे कमाल वेतन दरमहा रु. ५००/- इतके किंवा जास्त आहे अशा पदांवर नेमणुका करणे.

के) या योजनेच्या तरतुदीनुसार कामगार, मालक यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे.

एल) एखाद्या ठिकाणी 'मंदगतीने काम' सुरु आहे हे जाहीर करणे आणि या योजनेअन्वये प्राधिकृत केल्यानुसार त्यावर कार्यवाही करणे.

एम) योजनेत तरतुद केल्याप्रमाणे कामगार किंवा मालकांच्या विनंतीने एखाद्या मासिक कामगाराच्या समूहाकडील बदलीला मंजूरी देणे.

एन) खंड ३८ आणि ३९ अन्वये कामगारांच्या आणि मालकांच्या अपीलावर कार्यवाही करणे.

ओ) खंड ३५ खालील मर्यादित व्याप्तीपर्यंत, नोंदणी झालेल्या मालकांच्या आणि कामगारांच्या विरुध्द असलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईच्या कार्यवाहीच्या संबंधातील सर्व कामे पार पाडणे.

---

१) महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र. क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड-८((इ) 'आणि पदोन्नती' शब्द वगळण्यात आले.

---

## ९. सचिवांची कार्ये —

मंडळ आणि अध्यक्षांच्या कार्यास व अधिकारांना बाधा न आणता, सचिव योजनेद्वारे त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडील आणि ही कर्तव्ये पार पाडताना विशेषतः खालील बाबींसाठी तो जबाबदार असेल.

अे) मालकांच्या नोंदवहया ठेवणे, त्याचे समायोजन करणे, त्या सुस्थितीत ठेवणे, कोणत्याही मालकाच्या नावाची त्यात नोंद करणे किंवा पुर्ननोंद करणे जिथे जिथे अशा प्रकारची परिस्थिती उद्भवल्यास योजनेच्या तरतुदींच्या अनुसार कोणत्याही नोंदणी झालेल्या मालकाचे नांव नोंदवहीतून काढून टाकणे.

बी) आवश्यक असतील अशा कामगारांच्या नोंदवह्या किंवा अभिलेख वेळोवेळी ठेवणे, त्यांचे समायोजन करणे आणि त्यांना सुस्थितीत ठेवणे, यात जे कामासाठी तात्पुरते उपलब्ध नाहीत आणि ज्यांची अनुपस्थिती मंडळाकडून मान्य करण्यात आली आहे अशा कामगारांच्या संबंधातील कोणत्याही नोंदवह्या किंवा अभिलेखांचा समावेश असेल,

आणि परिस्थितीनुसार आवश्यक असेल तेव्हा, एकतर त्याच्या विनंतीवरुन किंवा योजनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नोंदणी झालेल्या. कामगाराचे नांव, कोणत्याही नोंदवहीतून किंवा अभिलेखातून काढून टाकणे.

सी) जेव्हा ते अन्यप्रकारे या योजनेनुसार नोकरीत नसून, कामासाठी उपलब्ध आहेत अशा नोंदणी झालेल्या कामगारांचे सेवायोजन करणे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे. १

डी) मंडळाकडून निश्चित करण्यात येतील अशा गटांमध्ये मंडळाकडून मिळालेल्या समूहात सूचनांच्या अनुसार, अनुरुप समुहात, नोंदणी झालेल्या कामगारांचे गट पाडणे किंवा पुनर्गट करणे.

इ) कामासाठी जे उपलब्ध आहेत अशा समुहातील नोंदणी झालेल्या कामगारांना नोंदणी झालेल्या मालकांकडे नेमून देणे आणि त्या प्रयोजनासाठी सचिव.

(i)समुहातील नोंदणी झालेल्या कामगारांचा पूर्णपणे शक्य असेल तितका उपयोग करील.

(ii) २ वगळण्यात आले

(iii) नोंदणी झालेल्या कामगारांच्या नोकरीचे आणि कमाईचे अभिलेख ठेवण्यासाठी तरतुद करेल.

(iv) ३ वगळण्यात आले

(एफ) (i) - योजनेखाली मालकांकडून किंवा कोणतेही अन्य अंशदान जमा करणे.

(ii) भविष्य निर्वाह निधी, विमा निधी किंवा इतर कोणताही निधी योजनेखाली स्थापन करण्यात येईल. अशा अन्य कोणत्याही निधीसाठी नोंदणी झालेल्या कामगारांची वर्गणी जमा करणे.

(iii)नोंदणी झालेल्या मालकांकडून प्रत्येक रोजंदारी कामगाराला त्याला कायदेशीरपणे देय असलेली त्याची सर्व कमाई प्रदान करणे आणि या योजनेच्या तरतुदीनुसार मंडळाकडून अशा कामगाराला देय असलेल्या सर्व पैशांचे प्रदान करणे.

जी) याबाबत अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदीच्या अधीनतेने मंडळ किंवा अध्यक्ष यांच्याकडून वेळोवेळी नियुक्त करण्यास प्राधिकृत केले असतील अशा अधिका-यांची किंवा कर्मचा-यांची नेमणूक करणे.

एच) ही योजना चालविण्याबाबतच्या खर्चाचे आणि त्याखालील सर्व जमा रकमा व खर्चाचे योग्य लेखे ठेवणे आणि तयार करणे आणि मंडळाला वार्षिक अहवाल व लेखापरिक्षित ताळेबंद आणि नफा तोटयाची विवरणपत्रे सादर करणे.

आय) प्रत्येक वर्षाच्या १५ फेब्रुवारीस किंवा त्यापूर्वी मंडळाला सादर करण्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्प तयार करणे.

जे) सर्व नोंदीत कामगारांच्या पूर्ण सेवेचा अभिलेख आणि सर्व नोंदीत मालकांचे अभिलेख पत्रक ठेवणे.

के) वगळण्यात आले १

एल) या योजनेच्या तरतुदीस अधीन राहून वेळोवेळी, मंडळाने किंवा अध्यक्षाने त्याला नेमून दिलेली असतील अशी इतर कार्य पार पाडणे.

---

१) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये 'जेव्हा ते या योजनेनुसार कामावर नसतात 'तेव्हा' हे शब्द वगळण्यात आले.

२) आणि ३) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये २) खंड ९ [९(II)] ३) खंड ९ [९(IV)] वगळण्यात आले.

---

**१०) कार्मिक अधिका-याचे कार्य –**

कार्मिक अधिकारी, सचिवाला त्याची कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करील आणि विशेषतः या योजनेच्या खंड ३५ अन्वये त्याला नेमून दिलेली कामे पार पाडील.

**११) नोंदवह्या ठेवणे –**

१) मालकांची नोंदवही- मंडळाने तयार केलेल्या नमुन्यात मालकांची एक नोंदवही असेल आणि त्यात या योजनेखाली नोंदणी झालेल्या मालकांची नांवे आणि पत्ते यांची नोंद केली जाईल.

२) कामगारांची नोंदवही - मंडळाने रूजू करून घेतलेल्या कामगारांची नोंदवही असेल, त्यात या योजनेखाली नोंदणी झालेल्या कामगारांच्या नांव व पत्त्यांची नोंद केली जाईल ती नोंदवही योग्यरितीने ठेवण्यात येईल..

3) मासिक नोंदवही - प्रत्येक मालकाने मासिक करारावर रूजू करून घेतलेल्या कामगारांसाठीची जे मासिक कामगार म्हणून ओळखले जातात अशा कामगारांची एक नोंदवही असेल.

४) समूह नोंदवही - मासिक नोंदवहीवर असण्याखेरीज समुह कामगार म्हणून ओळखल्या जाणा-या कामगारांची एक नोंदवही असेल. या नोंदवहीत टोळ्यांमधील प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी कोणत्याही टोळीशी संलग्न नाहीत अशा कामगारांच्या एका उप-समुहा अंतर्भाव असेल, अशा उप-समुहाचा समाविष्ट असणारे कामगार, रजाराखीव कामगार म्हणून ओळखले जातील.

**१२**}आणि

**१३**}वगळण्यात आले.

---

महाराष्ट्र शासन- महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड १२ आणि १३ वगळण्यात आले.

---

## १४. मालकांची नोंदणी –

प्रत्येक मालक २ ज्याला ही योजना लागू होते ३, त्याने मंडळाकडे, यायोजनेला जोडलेला नमुना 'अ द्वारे' या योजनेचे हे खंड लागू झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करेल. तथापि, कोणत्याही आस्थापनेचा मालक ही योजना लागू झाल्यावर नोंदणीसाठी एकाच वेळी अर्ज करेल ५. यापुढील तरतुद अशी की, कोणत्याही अनुसूचित रोजगारासाठी किंवा इतर क्षेत्रासाठी ६ विस्तारित केल्या गेल्यानंतर मालक त्या अनुसुची रोजगार किंवा विस्तारीत क्षेत्रात १ योजना लागू झाल्याच्या२ अशा भागात पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत होईल.

---

२) खंड १४ मधील – 'योजना ज्या क्षेत्रास लागू आहे त्या भागातील कापड बाजार किंवा दुकानांमध्ये खरेदी, विक्री किंवा व्यापार किंवा एजेंट म्हणून काम करण्यात व्यस्त असलेले' शब्द वगळले जातील दि.२९/०५/१९७३

३) खंड-१४ मध्ये - १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम (एक्सएल) अन्वये 'प्रत्येक मालका' च्या जागी 'ज्यांना योजना लागू होते' अशा शब्दाचा समावेश केला आहे.

४) खंड १४ मध्ये – 'मिळेल' या शब्दानंतर 'स्वत:' शब्दाचा समावेश करण्यात आला दि.२९/०५/१९७३

५) खंड १४ मध्ये – 'हा व्यवसाय' या शब्दासाठी 'त्याचा व्यवसाय या शब्दाचा समावेश करण्यात आला दि.२९/०५/१९७३.

६) खंड १४ मध्ये – 'कोणताही अनुसुचित रोजगार' या शब्दानंतर 'किंवा इतर क्षेत्रापर्यंत विस्तारीत' शब्दाचा समावेश करण्यात आला.

१) खंड १४ मध्ये- महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १०७६ प्र.क्र.१११० कामगार-५ दि. ०१/०१/१९७९ अन्वये 'त्या अनुसुचित रोजगारामध्ये' या शब्दानंतर 'किंवा विस्तारीत क्षेत्रामध्ये' शब्द समावेश करण्यात आले.

२) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १२७२ १५४८५५/ कामगार-४ दि. १५/१२/१९७२ अन्वये खंड १४ ला तरतुदी जोडल्या गेल्या.

---

## १५. विद्यमान व नविन कामगारांची नोंदणी

१ (अ) ही योजना लागू आहे अशा क्षेत्रातील नोकरीत जो नियत दिनांकास अगोदरच कामावर आहे अशा प्रत्येक कामागारांची, या योजनेखाली नोंदणी करण्यात येईल.

(ब) नवीन नोंदणीबाबतची अर्हता ही, स्थानिक परिस्थिती शारीरिक योग्यता, क्षमता किंवा अनुभव किंवा दोन्हीही विचारात घेऊन मंडळ विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल. भारताचा नागरिकच केवळ नोंदणीसाठी पात्र असेल.

(क) कोणत्याही नवीन प्रवर्गातील कामगारांची नोंदणी ही, याबाबत मंडळ विनिर्दिष्ट करीलअशा कोणत्याही तारखेस उक्त नोकरीत काम करीत आहेत किंवा काम करीत होते. अशा कामगारांमधून असेल. परंतु सदर कामगार वैद्यकीयदृष्ट्या निरोगी असावा आणि तो ६० वर्षापेक्षा अधिक वयाचा नसावा.

२ या योजनेत काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळाच्या मते, जर एखाद्या कामगाराने, तरतूदत त्याच्या अर्जात खोटी माहिती देऊन किंवा त्यात आवश्यक असलेली कोणतीही माहिती मागे ठेवून त्याने नोंदणी करुन घेतली आहे किंवा एखाद्या कामगाराने अयोग्य रितीने किंवा चुकीच्या पध्दतीने नोंदणी करुन घेतली आहे असे आढळून आल्यास, मंडळ नोंदवहयातून त्याचे नाव काढून टाकण्यास निर्देश देऊ शकेल.

परंतु असा कोणताही निर्देश देण्यापूर्वी, मंडळ, अशा कामगाराला प्रस्तावित निर्देश का देण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखविण्याची संधी देईल.

---

## १६. मासिक कामगारांमध्ये रिक्त झालेल्या जागा

१) मासिक कामगारांमधील रिक्त झालेली जागा, मालक सचिवांच्या मान्यतेने भरेल. मालकासाठी काम करणाऱ्या टोळीतील समूहातील कामगार यांना नोकरीतील अशी रिक्त जागा भरण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येईल. जर एकही समूहातील कामगार, रिक्त झालेल्या जागेवर मासिक कामगार म्हणून काम करण्यास इच्छुक नसेल तर मालक त्याच्या स्वत:च्या निवडीचा कामगार नेमून रिक्त जागा भरेल आणि सदर कामगाराची या योजनेंतर्गत नोंदणी केली जाईल.*

२) टोळीमधील ज्या कामगाराची नेमणूक मासिक कामगार म्हणून झाली असेल तो मुकादम आणि टोळीतील इतर कामगार यांच्या परवानगीनेच त्याच्या टोळीत परत

जाऊ शकतो. अशा प्रकारची बदली होताना संबंधित मालकाच्या अंतर्गत सेवा देताना, मालकाच्या अखत्यारीतील जे फायदे कामगाराला  झाले असते किंवा ज्या फायद्यांसाठी  मालक जबाबदार राहिल असे सर्व फायदे मंडळाकडे वर्ग होतील.

३) एखाद्या मासिक कामगाराची सेवा जर मालकाने कोणत्याही कारणासाठी संपुष्टात आणली असेल, तर तो कामगार मालकाविरुद्ध मंडळाकडे अपील करू शकतो. अशा प्रकरणात मंडळाने दिलेला निर्णय कामगार आणि मालक यांच्यावर बंधनकारक राहील.

---

*शासन अधिसुचना क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड १६ मध्ये (I) बदल केला.

---

## १७. वैद्यकीय तपासणी

(१) जर मंडळाला तसे करणे आवश्यक वाटत असेल तर मंडळ नोंदणीपूर्वी एखाद्या नवीन कामगाराला, या प्रयोजनासाठी अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या अशा वैद्यकीय अधिकाऱ्याकडून, शारीरिक पात्रतेसाठी, निःशुल्क अशी एखादी वैद्यकीय तपासणी करुन घेण्यास भाग पाडू शकेल. एखाद्या वैद्यकीय अधिका-याकडून वैद्यकीयदृष्टया अयोग्य असल्याचे आढळलेला एखादा कामगार अध्यक्षांकडे लेखी स्वरुपात अर्ज करील आणि त्याचवेळी, एखाद्या वैद्यकीय तपासणीसाठी याबाबत खास निर्देश केले असेल असे शुल्क त्याच्याकडे जमा करील, अशी एखादी विनंती प्राप्त झाल्यावर, अध्यक्ष एक वैद्यकीय मंडळाची रचना करील, अशा वैद्यकीय मंडळाचा निर्णय अंतिम असेल आणि वैद्यकीयदृष्टया अयोग्य असलेला कामगार, नोंदणीसाठी हक्कदार असणार नाही.

(२) जर अध्यक्ष तसे करणे आवश्यक समजत असेल तर, एखादा कामगार अध्यक्षांकडून रचना करण्यात येईल अशा एखाद्या वैद्यकीय मंडळाकडून एखादी वैद्यकीय तपासणी निःशुल्क करुन घेईल. अशा कामगारांच्या संबंधातील अशा वैद्यकीय मंडळाचा निर्णय अंतिम असेल. जर, वैद्यकीय मंडळाला कामगार कायमस्वरुपी अयोग्य असल्याचे आढळून आले तर, अध्यक्ष त्याची सेवा तात्काळ समाप्त करतील.

## (१८) नोंदणी शुल्क -

१) या योजनेअन्वये नोंदणीच्या वेळी प्रत्येक कामगार मंडळाला नोंदणीची फी म्हणून एक रुपया देईल..

२) या योजनेअन्वये नोंदणीच्या वेळी प्रत्येक मालक नोंदणीची फी म्हणून पंचवीस रुपये देईल.

**(१९) कार्ड पुरविणे**

१) नोंदणी झालेल्या प्रत्येक कामगाराला, मंडळाने तयार केलेल्या नमुन्यात ओळखपत्र, पुरविण्यात येईल.

२) असे कार्ड गहाळ झाल्यास एक नवीन कार्ड देण्यात येईल. परंतु मंडळाकडून निश्चित करण्यात येईल अशी त्याची किंमत संबंधित कामगाराला द्यावी लागेल.

---

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड १९ मध्ये (I) बदल केला.

---

**२०) नोंदणी झालेल्या कामगाराचा सेवा अभिलेख -**

प्रत्येक मासिक व रोजंदारी कामगाराचा सेवेचा अभिलेख मंडळ विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात ठेवण्यात येईल आणि त्यात इतर गोष्टींबरोबर, कामगारांच्या विरुध्द करण्यात आलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबतच्या संपूर्ण नोंदी, बढत्या, चांगल्या कामाची प्रशंसा इत्यादी आणि मंडळाला त्यात समाविष्ट करणे योग्य वाटेल असा अन्य तपशिल यांचा समावेश असेल. मासिक कामगारांच्या संबंधातील असा तपशिल नोंदणी झालेल्या मालकांकडून मंडळाला पुरविण्यात येईल.

**२१) नोंदणी झालेल्या मालकांचे अभिलेख पत्रक —**

कार्मिक अधिकारी, मंडळ तयार करील अशा प्रपत्रात, प्रत्येक नोंदणी झालेल्या मालकाच्या संबंधात एक अभिलेख पत्रक ठेवील आणि त्यात, इतर गोष्टींबरोबरच, नोंदणी झालेल्या मालकाच्या विरुध्द करण्यात आलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईच्या संपूर्ण नोंदीचा समावेश असेल.

**२२) कार्ड परत करणे -**

कामगाराचे कार्ड खालील परिस्थितीत मंडळाकडे परत करण्यात येईल..

अ) सात किंवा त्यापेक्षा अधिक दिवसांच रजेवर जाताना.

ब) सेवेतून निवृत्त होताना.

क) सेवेतून बडतर्फ किंवा मुक्त केल्यास.

ड) तात्पुरत्या स्वरुपात निलंबित केल्यास, किंवा

ई) मृत्युनंतर.

तथापि, वरील (अ), (ब), (क), (ड) आणि (ई) प्रकरणी, मासिक कामगाराचा मालक देखील, कामगारांचे कार्ड मंडळाला परत करील.

**२३)** वगळण्यात आले दि.२९/०५/१९७३

---

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये वगळण्यात आले.

---

**२४) मासिक कामगाराचे सेवायोजन -**

१) हि योजना लागू झाल्याच्या दिवशी जे कामगार मासिक मजूरीवर काम करीत असतील ते पुढेही त्याच क्षमतेने, त्याच मालकाकडे काम करतील

२) जर मालकाच्या अंतर्गत योजनेच्या अमलबजावणीच्या वेळी प्रचलित असलेली कोणतेही पीस रेटेड (वस्तू व वजनावरील आधारित मजूरी) पध्दत सचिवांच्या मंजूरी शिवाय मासिक दर (मासिक मजूरीवर आधारित) पध्दतीमध्ये रूपांतरीत केली जाणार नाही.

---

** महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये संपूर्ण खंड २४ बदलले आहे.

---

**२५)** आणि **२६)** वगळण्यात आले.

---

*** महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड २५ आणि २६ वगळण्यात आले.

---

**२७. सुट्टया –**

प्रत्येक कामगार, खंड ३३ अन्वये मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने एका वर्षात चार पगारी सुट्टयांना हक्कदार राहील. या चार सुट्टयांपैकी तीन सुट्टया म्हणजे (i)२६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), (ii) १ मे (महाराष्ट्र दिन) आणि (iii) १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन) अशा असतील. चौथी सुट्टी मंडळाकडून निश्चित करण्यात येईल.

**२८.** वगळण्यात आले. १

---

१) १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र एक्स एल अन्वये खंड २८ वगळण्यात आला.

---

## २९. नोंदणी झालेल्या कामगारांवरील बंधने

(१) नोंदणी झालेल्या प्रत्येक कामगाराने या योजनेची बंधने स्विकारलेली आहेत, असे समजण्यात येईल.

२) जो कामासाठी उपलब्ध आहे असा समुहातील नोंदणी झालेला कामगार, मंडळाच्या नोकरीत आहे असे समजण्यात येईल.

३) कुठलाही नोंदणीकृत कामगार, सचिवांनी विशिष्ट मालकाकडे त्याची नेमणूक केल्याशिवाय, स्वतःहून कुठल्याही मालकाकडे नोकरी करणार नाही.२

४) समूहातील नोंदणीकृत कामगार जो कामासाठी उपलब्ध असेल तो मंडळाने दिलेल्या निर्देशाचे पालन करेल आणि मंडळाने नेमून दिलेल्या कोणत्याही रोजगाराचा तो स्वीकार करेल. ३

५) नोंदणीकृत कामगार जो कामासाठी उपलब्ध असेल त्याची मंडळाद्वारे नोंदणीकृत मालकाकडे नेमणूक झाल्यावर, तो त्याचे काम व कामाबाबतची कर्तव्ये, नोंदणीकृत मालकाने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने किंवा पर्यवेक्षकाने दिलेल्या निर्देशानुसार तसेच रोजगाराच्या किंवा तो जिथे काम करत आहे त्या रोजगाराच्या आणि ठिकाणाच्या जागी असलेल्या नियमांनुसार आपली कर्तव्ये पार पाडेल.

६) एका गटातील सर्व कामगार, काम करत असताना त्यांच्या कामाच्या दरम्यान त्यांच्याकडे कामासाठी सोपवलेल्या वस्तूंची/ मालाची खराबी झाल्यास किंवा गहाळ झाल्यास, त्यासाठी ते संयुक्तपणे जबाबदार असतील. खराब झालेल्या किंवा हरवलेल्या वस्तूंची/मालाची किंमत मंडळ ठरवेल आणि ती मंडळाकडून कामगारांच्या मजूरीतून योग्य हप्त्यामध्ये कपात करून वसूल केले जाईल, आवश्यक असल्यास मालकाल अदा करून निश्चित केली जाईल.+

---

२ आणि ३ - महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड २९ मध्ये (३) आणि (४) बदली करण्यात आले.

+ महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये २९ मध्ये (६) समाविष्ट करण्यात आले.

---

## ३०. नोंदणी झालेल्या मालकांवरील बंधने

(१) प्रत्येक नोंदणी झालेल्या मालकाने योजनेची बंधने स्विकारली पाहिजेत.

(२) नोंदणीकृत मालक, या योजनेच्या तरतुदीनुसार सचिवांनी नेमणूक केलेल्या

कामगाराव्यतिरिक्त स्वत:हून इतर कुठल्याही अन्य कामगाराची नेमणूक करणार नाही.*

(3) वगळण्यात आले.

४) नोंदणीकृत मालक, मंडळाकडे या संदर्भात इतर कोणतीही सूचना नसल्यास, कामगारांनी केलेल्या कामाचा तपशील, पीस रेट (नग दरावर) स्वरूपात, तसेच त्याने रोजगारावर ठवलेल्या कामगारांसंबंधित इतर आवश्यक आकडेवारी दाखल करेल.

(५) नोंदणीकृत मालक मंडळाकडे, मंडळ निदेश देईल अशा पध्दतीने व अशा वेळी खंड ४२ (१) अन्वये असलेली प्रदाने आणि लेव्ही, रोजंदार कामगारांना एकूण देय मजुरी व रोजंदार कामगारांना असलेल्या इतर देय रकमा मंडळास अदा करील.

(६) नोंदणी झालेला मालक, मंडळाने आवश्यक केले असतील असे अभिलेख ठेवील व मंडळासमोर किंवा वाजवी नोटीस देऊन मंडळाने पदनिर्देशित केले असेल अशा व्यक्तीच्या समोर कामगारांच्या संबंधातील असे सर्व प्रकारचे अभिलेख आणि ज्या कामासाठी ते नेमले आहेत अशा कामासंबंधातील कोणत्याही प्रकारची इतर कोणतीही कागदपत्रे सादर करील आणि त्यासंबंधात मंडळाने किंवा मंडळाच्यावतीने काढलेल्या कोणत्याही नोटीशीत किंवा निदेशात दिली असेल अशी माहिती पुरवील.

---

*खंड ३० मध्ये महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये उपखंड (२) बदली करण्यात आले.

** खंड ३० मध्ये महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये उपखंड ४(३) वगळण्यात आले.

---

**३१) रोजगारावरील निर्बंध-**

(१) कामगार हा नोंदणी झालेला कामगार असल्याशिवाय कोणताही मालक त्या कामगाराला नोकरीला ठेवणार नाही.

(२) जेव्हा कामाचा अचानक उद्भवलेला अतिरिक्त ताण येतो, किंवा मालकाला काम तात्काळ पूर्ण करणे आवश्यक असेल त्याला नेमून दिलेल्या टोळीतील कामगार ते काम पूर्ण करण्यास असमर्थ असतील, तर मुकादम स्वत: किंवा मालकाच्या निर्देशानुसार दुसऱ्या गटातील अतिरिक्त नोंदणीकृत कामगारांची काम पूर्ण करून घेण्यासाठी त्यावेळीपूर्ती नेमणूक करता येईल.

३) वगळण्यात आले – दि.२९/०५/१९७३*

---

१) खंड ३१ (१) मध्ये- महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये मालक शब्दानंतर कंस आणि शब्द '(ही योजना लागू केलेल्या कोणत्या क्षेत्रात नोंदणीकृत मालका व्यतिरिक्त)' वगळण्यात आले.

२) खंड ३१ (२) मध्ये - महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये बदल करण्यात आले.

* खंड ३१ (३)महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये वगळण्यात आले.

---

**३२. ही योजना लागू असणे बंद होईल ती परिस्थिती -**

१) नोंदणी झालेल्या कामगाराचे नांव जेव्हा नोंदवहीतून किंवा अभिलेखातून या योजनेच्या तरतुदीनुसार काढून टाकण्यात येईल तेव्हा ही योजना नोंदणी झालेल्या कामगाराला लागू असण्याचे बंद होईल.

(२) ह्या योजनेच्या तरतुदीनुसार जेव्हा नोंदणी झालेल्या मालकाचे नाव मालकांच्या नोंदवहीतून काढून टाकण्यात येईल तेव्हा ही योजना नोंदणी झालेल्या मालकाला लागू असण्याचे बंद होईल.

(३) एखादी व्यक्ती ही नोंदणी झालेला कामगार किंवा नोंदणी झालेला मालक असेल तेव्हा त्या दरम्यान कोणत्याही वेळी उपार्जित केलेल्या त्याच्या कोणत्याही हक्काला किंवा असलेल्या कोणत्याही दायित्वाला या खंडातील कशानेही बाधा येणार नाही.

**३३. कामगाराची मजुरी, भत्ते व सेवेच्या अन्य शर्ती -**

(१) या योजनेत विशिष्टपणे अन्यथा तरतुदीत केले नसेल तर, कोणत्याही निवाड्याच्या तरतुदींना बाधा न आणता, नोंदीत कामगार (समुहातील किंवा मासिक नोंदवही वरील) आणि नोंदीत मालक यांच्यातील करारात एक सुचित केलेली शर्त असेल की, दर, भत्ते व अतिकाल, कामाचे तास विश्रांतीची मध्यांतरे, पगारी रजा व सेवेच्या अन्य शर्ती या मंडळाने कामगाराच्या प्रत्येक प्रवर्गासाठी निश्चित केल्यानुसारच मात्र उप-खंड (२) (३) (४) व (५) आणि (६) च्या तरतुदीस अधीन राहून असतील.**

(२) नोंदणी झालेल्या कामगारांच्या वेतनाचे निश्चित दर, भत्ते आणि कामाचे अतिकालिक तास, विश्रांती मध्यंतर, पगारी रजा व इतर सेवा शर्ती (ज्यांचा यात यापुढे सेवा शर्ती म्हणून सामायिकपणे उल्लेख करण्यात आला आहे) इत्यादींच्या निर्धारीकरणाच्या प्रयोजनासाठी किंवा त्यांचे पुनर्निर्धारण करण्यासाठी किंवा

त्यांच्यात फेरबदल करण्यासाठी नोंदणी झालेल्या असंरक्षित कामगारांच्या बाबतीत, ह्या योजनेखाली निश्चित करण्यात किंवा सुधारणा करण्यात किंवा फेरबदल करण्यात येतील अशा सेवा शर्तीच्या बाबतीत मंडळ, ही योजना लागू असलेल्या मालक संघांना आणि श्रमिक संघटनांना, त्यांना योग्य वाटेल असे अभिवेदन देण्यासाठी मंडळ विनंती करील. जर असा कोणताही मालक संघ किंवा श्रमिक संघटना नसेल तर मंडळाला योग्य वाटेल अशा पध्दतीने नोटीस प्रसिध्द करुन नोंदणी झालेल्या मालकांच्या व कामगारांच्या अशा प्रतिनिधीकडून अशी अभिवदने मागविण्यात येतील.१

(३) असे प्रत्येक अभिवेदन लेखी स्वरुपात असेल आणि ते, मंडळ खास निर्देश करेल अशा कालावधीत करण्यात येईल आणि त्यामध्ये अशा सेवा शर्ती नमूद असतील ज्या, असे अभिवेदन करणा-या व्यक्तीच्या मते वाजवी तसेच अशा सेवाशर्तीची पूर्तता करणा-या किंवा त्या अदा करणा-या मालकांच्या क्षमतेशी किंवा असे निवेदन करणा-या व्यक्तीस अनुरुप वाटेल अशा अन्य कोणत्याही परिस्थितीशी निगडीत असतील.२

४) मंडळ उपरोक्त अभिवेदन कोणतेही असल्यास विचारात घेईल आणि त्याच्यासमोर ठेवलेल्या सर्व माहितीची तपासणी केल्यानंतर ते, नोंदणी झालेल्या कामगारांच्या सेवा शर्ती निश्चित करील किंवा त्यात सुधारणा करील किंवा यथास्थिती त्यात फेरबदल करील.३

(५) नोंदीत कामगारांच्या सेवा शर्ती निश्चित करताना, त्यात सुधारणा करताना किंवा यथास्थिती त्यात फेरबदल करताना मंडळ, राहणी-मानाचा खर्च, स्थानिक क्षेत्रातील तुलनीय नोक-यांतील प्रचलित सेवा शर्ती, नोंदणी झालेल्या मालकांची वेतन देण्याची क्षमता आणि मंडळाला अनुरुप वाटतील अशा अन्य कोणत्याही परिस्थिती लक्षात घेईल.४

(६) मंडळाने निश्चित केलेल्या, पुनर्निर्धारीत केलेल्या किंवा फेरबदल केलेल्या सेवा शर्ती, एकतर मंडळ ठरविल त्या दिनांकापासून भावी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि मंडळाचा निर्णय मंडळाला योग्य वाटेल अशा पध्दतीने नोंदीत कामगारांना व मालकांना कळविण्यात येईल.५

---

** १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.एक्स एल अन्वये खंड ३३ च्या उपखंड (९) म्हणून क्रमांकित केले आणि उपखंड (१) मध्ये 'असे' शब्द कंस आणि आकडे 'असे असतील' या शब्दासाठी पुन्हा क्रमांकित केले गेले. 'उपखंड (२), (३),(४),(५) आणि (६) च्या तरतुदींच्या आधिन राहतील.'

१)१९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.एक्स एल अन्वये खंड ३३ (२), (३),(४),(५) आणि (६) समावेश करण्यात आले.

२)

३)

४)

५)

---

## ३४) नोंदीत कामगारांना रोजगार आणि इतर भत्त्यांचे संवितरण –

मंडळ, नोंदणी झालेल्या मालकांना, ह्या योजनेखाली त्यांच्याकडून प्राधिकृत असलेल्या आणि वसुलीयोग्य असतील अशा वजाती केल्यानंतर त्यांनी कामाला ठेवलेल्या नोंदीत मासिक कामगारांना वेतन आणि इतर भत्ते देण्यास परवानगी देईल, वेळोवेळी नोंदणी झालेल्या मालकांनी कामावर ठेवलेल्या मासिक कामगारांव्यतिरिक्त इतर कामगारांच्या बाबतीत नोंदणी झालेल्या मालकांकडून देय असणारे वेतन व इतर भत्ते प्रत्येक पंधरवड्याला नोंदणी झालेल्या मालकाकडून मंडळाच्या सचिवांकडे पाठविले जातील. त्यानंतर सचिव या योजनेनुसार नोंदीत कामगारांना त्यांच्याकडून वसुलीयोग्य वजातीच्या अधीन राहून प्रत्येक महिन्याच्या विनिर्दिष्ट दिवशी वेतनाचे व इतर कोणत्याही देय असलेल्या रकमांचे संवितरण करण्याची व्यवस्था करील.

---

* महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड ३४ मध्ये 'धनादेशाद्वारे' शब्द वगळण्यात आला.

---

## ३५) शिस्तभंगाची कारवाई

(i) (एक) कार्मिक अधिकारी, एखादी लेखी तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा प्राप्त झाल्यावर या योजनेच्या तरतुदींना पार पाडण्यास नोंदीत मालकाने कसूर केलेली आहे. अशी माहिती मिळाल्यावर त्या बाबीची तपासणी केल्यानंतर त्याचा तपासणी लेखी अहवाल सादर करेल.**

ii) सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि अध्यक्षांना योग्य वाटेल अशा प्रकारची पुढील चौकशी केल्यावर अध्यक्षांनी, मालकाने योजनेची तरतुद पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्याचे समाधान केल्यावर अध्यक्ष मालकाला लेखी स्वरूपात ताकिद देऊ शकतात किंवा या योजनेच्या तरतुदीअतंर्गत मालकावर खटला चालविण्यात यावा यासंबंधी निर्देश देऊ शकतात.

iii) अध्यक्षांनी दिलेली ताकिद अन्यायकारक आहे असे वाटल्यास, नोंदणीकृत मालक मंडळाकडे अपिल करू शकतो.

(२) समुहातील नोंदणीकृत कामगाराकडून या योजनेच्या कोणत्याही तरतुदीचे अनुपालन करण्यात कसूर झाल्यास किंवा ज्यामुळे शिस्तीचा भंग होईल अशी कोणतीही कृती झाल्यास किंवा कोणतेही वर्तन झाल्यास कार्मिक अधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करता येईल. कार्मिक अधिकारी, चौकशी केल्यावर अशा कामगाराला लेखी स्वरूपात ताकिद देऊ शकतात किंवा चार दिवसांपेक्षा जास्त नसेल इतक्या कालावधीसाठी तात्पुरते कामावरून निलंबित करू शकतात.*

(३) जेथे उप-खंड (2) मध्ये तरतुद केलेल्या शिक्षेपेक्षा अधिकतर शिक्षा रास्त आहे असे कार्मिक अधिका-यांचे मत असेल तेथे तो ते प्रकरण अध्यक्षांकडे वर्ग करेल.**

(४) उप-खंड (3) अन्वये कार्मिक अधिकारी यांचेकडून लेखी अहवाल मिळाल्यावर किंवा मालकाकडून किंवा दुस-या एखाद्या व्यक्तीनुसार समुहातील नोंदणी झालेल्या कामगाराने या योजनेच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा त्याने गैरशिस्तीचे किंवा गैरवर्तणूकीचे एखादे कृत्य केले असेल किंवा प्रमाणभूत किंवा ग्राह्य उत्पादन निर्माण करण्याच्या अनुरोधाने सतत अपयशी ठरला असेल किंवा इतर कोणत्याही प्रकारे अकार्यक्षम असेल तर अध्यक्ष योग्य वाटेल अशी पुढील तपासणी करेल किंवा करायला लावील आणि त्यानंतर संबंधीत कामगारांच्या संबंधात पुढील उपाययोजनांपैकी कोणतीही उपाय योजना करेल, म्हणजे तो पुढीलप्रमाणे कोणत्याही शास्ती लादेल :-

(अ) त्याला लेखी ताकीद देईल.

(अ) अ) चार दिवसाहून अधिक नसणा-या कालावधीकरीता त्याला निलंबित करील.**

(ब) एक महिन्याची नोटीस देऊन किंवा त्याऐवजी त्याला महागाई भत्त्यासह एक महिन्याचे वेतन देऊन त्याची सेवा समाप्त करील, किंवा

(क) त्याला बडतर्फ करील.

५) ह्या खंडाअन्वये कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीत व्यक्तीला तिच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही का करण्यात येऊ नये याची कारणे दाखविण्याची एक संधी देण्यात येईल.

५-अ) वरील उप-खंड (२) किंवा (४) खालील प्रलंबित कालावधीत अध्यक्षांकडून संबंधीत कामगारास निलंबित केले जाऊ शकेल. *

(६) खंड ३६ अन्वये असलेल्या अध्यक्षांच्या शक्तिना बाधा न पोहचविता, नोंदणी झालेल्या मालकाला त्याच्याकडून कामाला लावलेल्या मासिक कामगाराच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार असतील.

---

** खंड ३५ मध्ये - महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड ३५(१) बदल करण्यात आले.

*खंड ३५ मधील- खंड ३५(२) मध्ये 'लेखी ताकिद' शब्दानंतर 'किंवा त्याला चा चार दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी निलंबित करू नये' याचा समावेश आणि

** खंड ३५ मध्ये - शासन अधिसुचना क्र.युडब्लुए - १०७६/प्र.क्र.-१११०/ कामगार-५ दि. १ जुन १९७९अन्वये (४-अअ) समावेश केला.

*खंड ३५ मध्ये - शासन अधिसुचना क्र.युडब्लुए - १०७६/प्र.क्र.१११०/ कामगार-५ दि. १ जुन १९७९ अन्वये (५अ) समावेश केला.

---

## ३६. अध्यक्षांच्या शिस्तविषयक विशेष शक्ति :-

(१) या योजनेत काहीही समाविष्ट असले तरी, चौकशीनंतर जर अध्यक्षांचे समाधान झाले की, नोंदीत कामगारांच्या कोणत्याही टोळीकडून किंवा कोणत्याही एका कामगाराकडून 'मंद गती' चा अवलंब करण्यात आला आहे व ती कामाच्या त्याच किंवा वेगवेगळया ठिकाणी त्याच टोळीने किंवा कामगाराने किंवा वेगवेगळ्या टोळ्यांनी किंवा कामगारांनी चालू ठेवली आहे किंवा तिची पुनरावृत्ती केली आहे तर ती तशी लेखी घोषणा करतील.

(२) उप-खंड (१) अन्वये घोषित करण्यात येईल तेव्हा ते अध्यक्षांकरीता

(i)मासिक कामगारांच्या बाबतीत नोंदीत मालकांच्या हक्कांना बाधा न आणता अशा कामगारांविरुध्द त्याला उचित वाटेल अशी, कामावरुन काढून टाकण्यासह, शिस्तभंगाची कार्यवाही करणे याबाबत आणि.

(ii) समुहातील नोंदीत कामगारांच्या बाबतीत अशा कामगाराविरुध्द, योग्य वाटेल अशी बडतर्फीचा समावेश असलेली, शिस्तभंगाची कार्यवाही करणे. याबाबत कायदेशीर असेल.

३) अध्यक्षाला शिस्तभंगाची कार्यवाही करता येईल –

(i) जेथे टोळीच्या सर्व सदस्यांनी मंदगती चा अवलंब केला असेल तेथे टोळीच्या सर्व सदस्यांविरुध्द आणि

(ii) जेथे एखाद्या कामगाराने मंदगती चा अवलंब केला असेल तेथे संबंधीत कामगाराविरुध्द.

(४)कोणत्याही कामगाराविरुध्द किंवा कोणत्याही कामगारांच्या टोळीविरुध्द या

खंडाअन्वये शिस्तभंगाची कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी त्याला किंवा तिला त्याच्याकिंवा तिच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही का करु नये याची कारणे दाखविण्याची एक संधी देण्यात येईल.

परंतु असे की, अध्यक्षाला उपखंड (१) अन्वये घोषित केल्यानंतर, या उपखंडान्वये कारणे दाखविण्याची संधी देण्यापूर्वी तात्काळ कोणत्याही कामगाराला किंवा कामगारांच्या टोळीला कामावरुन निलंबित करता येईल.

(५) एखाद्या कामगाराने किंवा कामगारांच्या टोळीने मंदगती चा अवलंब केला आहे असे करण्यात आलेले अध्यक्षांचे प्रतिज्ञापन हे अंतिम असेल व त्यावर त्यास कोणत्याही सबबीवर आव्हान देता येणार नाही.

---

**३७ रोजगाराची समाप्ती -**

(१) समुहातील नोंदीत कामगाराचा रोजगार हया योजनेच्या तरतुदींना अनुसरुन असेल त्या व्यतिरिक्त समाप्त करण्यात येणार नाही.

(२) समुहातील नोंदीत कामगार, मंडळाला चौदा दिवसांची लेखी नोटीस दिल्याशिवाय किंवा त्याऐवजी त्याच्या महागाई भत्त्यासह चौदा दिवसांचे वेतन मंडळाला समपहरण केल्याशिवाय मंडळातील त्याचा रोजगार सोडणार नाही.

(३) जेव्हा उप-खंड (१) आणि (२) अन्वये मंडळाच्या नोंदीत कामगाराचा रोजगार समाप्त होतो तेव्हा त्याचे नाव मंडळाकडून नोंदवहीतून किंवा अभिलेखातून ताबडतोब काढून टाकण्यात येईल.

---

**३८)कामगारांनी अपील करणे**

(१) हया खंडात अन्यथा तरतुदीत केले असेल त्याव्यतिरिक्त, खंड ३५ अन्वये प्राधिका-याने पारित केलेल्या आदेशाने व्यथित झालेल्या समुहात असलेल्या कामगारास, कार्मिक अधिका-याच्या आदेशाविरुध्द अध्यक्षाकडे आणि अध्यक्षाच्या आदेशाविरुध्द राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल.

(२) जो कामगार

(i) नोंदवही किंवा अभिलेखातील विशिष्ठ गटात स्थान देण्याच्या, किंवा

(ii) खंड १५अन्वये नोंदणीला नकार देणा-या, किंवा

(iii) तो ज्या प्रवर्गातून आलेला आहे त्या प्रवर्गाचे नसलेले, खंड २९ (४) (ब)

अन्वये कोणतेही काम हाती घेण्यास त्याला भाग पाडणा-या सचिवाच्या आदेशाने व्यथित झाला आहे, त्याला अध्यक्षाकडे अपील दाखल करता येईल.

३) वगळण्यात आले दि.२९/५/७३

(४) नोंदवहीतून किंवा अभिलेखातून त्याचा आकार कमी करण्यासाठी ज्या कामागरांची नावे काढून टाकावयाची असतील अशा कामगारांच्या वर्णनात किंवा वर्गात नोंदणी झालेला कामगार मोडतो हे जर नाव काढून टाकण्याचे कारण असेल तर, मंडळाच्या सूचनांनुसार नोंदवहीतून किंवा अभिलेखातून नोंदीत कामगाराचे नाव काढून टाकण्याची रीतसर नोटीस जेथे दिलेली असेल तेथे कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

मात्र असे की, जेथे नोंदीत कामगार हा, मंडळाच्या सूचनांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कामगारांच्या वर्गातील किंवा वर्णनातील नाही असे अभिकथन करतो तेथे अध्यक्षाकडे अपील करता येईल.

(५) उप-खंड (१), (२), *मध्ये निर्दिष्ट केलेले प्रत्येक अपील लेखी असेल आणि आदेशाविरुध्द केलेले अपील आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत दाखल केलेले असेल.

मात्र अपील प्राधिका-यास नोंद केलेल्या कारणास्तव चौदा दिवस संपल्यानंतर करण्यात आलेले एखादे अपील दाखल करुन घेता येईल.

---

*महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड ३८ मधील (३) वगळण्यात आले.

* महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड ३८ मधील (५) कंस आणि आकडा (३) वगळण्यात आला.

---

**३९**} आणि वगळण्यात आले दि. २९/०५/१९७३**

**४०**}

**महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. मुद्दा क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये खंड ३९ आणि ४० वगळण्यात आला.

**४१)विवक्षित अपीलांच्या बाबतीत आदेशाला स्थगिती देणे -**

जेथे एक महिन्याच्या नोटीसीने सेवा समाप्तीच्या आदेशाविरुध्द खंड ३८ च्या तरतुदीनुसार कामगाराने अपील केले असेल किंवा खंड ३९ मधील तरतुदीनुसार मालकांच्या नोंद पुस्तकातून +++ त्याचे नाव काढून टाकण्याच्या आदेशाविरुध्द एखादे अपील दाखल केले असेल तेथे अपील प्राधिका-याला अपीलाची सुनावणी व त्याचा अंतिम निकाल या दरम्यान अपील केलेल्या आदेशाला स्थगिती देता येईल.

---

+} शासन अधिसुचना दि.२९/०५/१९७३ खंड ४१ मध्ये 'किंवा मालकाने आवाहनास प्राधान्य

++} दिले आहे' या शब्दांची सुरू होणारा भाग आणि शब्द, आकडे, कंस, अक्षराने समाप्त होणारा आणि नंतर खंड ३५ खालील (I)(II)(ब) वगळण्यात आला.

---

**४२) योजना राबविण्याचा खर्च आणि नोंदीत कामगारांना सुखसोयी व लाभ यासाठीच्या तरतूदी -**

(१) ही योजना राबविण्याचा खर्च आणि अधिनियमातील तरतुदीनुसार आणि ह्या योजनेतील++ तरतुदीनुसार नोंदीत कामगारांना निरनिराळे लाभ, सुविधा आणि सुखसोयींची तरतुद करण्यासाठी येणारा खर्च, नोंदीत मालकांनी मंडळाला केलेल्या प्रदानांनी भागविला पाहिजे. प्रत्येक नोंदणी झालेला मालक हा त्याला नेमून दिलेल्या व त्याने कामावर लावलेल्या नोंदीत कामगारांच्या बाबतीत मंडळाने जाहीर नोटीशीने किंवा नोंदीत मालकांस लेखी आदेशाने वेळोवेळी +++ खास निर्देश केले असेल त्याप्रमाणे आणि मंडळाने निदेश दिला असेल अशावेळी लेव्ही मार्गाने अशी रक्कम मंडळाला देईल.

(2) वगळण्यात आले. xx

(3) मंडळ, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज एकूण वेतन देयकाच्या२ तिस XXX टक्क्याहून १ अधिक कोणत्याही लेव्हीला मंजूरी देणार नाही.

(४) नोंदणी झालेला मालक अनामत ठेवीच्या मार्गाने मंडळाला मागणीप्रमाणे प्रदान करील किंवा उप-खंड (१) मध्ये संदर्भित केलेल्या रकमेच्या नियत प्रदानाकरीता मंडळाला आवश्यक वाटेल अशी इतर हमी पुरवील.

(५) सचिव, योजनेच्या कार्यान्वयन व वित्तपुरवठा या संबंधात वाजवीरित्या आवश्यक असेल अशी आकडेवारी आणि इतर माहिती वेळोवेळी मंडळाला पुरविल.

६) जर नोंदणी झालेल्या मालकाने मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत उप-खंड

(१) अन्वये त्याच्याकडून देय असलेले प्रदान करण्यात कसूर केली तर आणि त्याने नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत त्याची देणी दिली नाहीत तर त्या मालकाला नोंदीत कामगारांचा पुरवठा बंद करण्यात येईल, अशा अर्थाची नोटीस सचिव त्या मालकावर बजावील. नोटीसीचा कालावधी संपल्यावर सचिव, कसूरदार मालक जोपर्यंत त्याची देय देणी भरत नाही तोपर्यंत त्यास नोंदीत कामगारांचा पुरवठा स्थगित ठेवील.

---

+ खंड ४२ मध्ये शासन अधिसुचना दि.२९/०५/१९७३ अन्वये शीर्षक (अ) मध्ये 'योजना' या शब्दानंतर आणि 'नोंदणीकृत कामगारांसाठी सोयी आणि सुविधा' हे शब्द समावेश केले आहेत. (ब) शब्दासाठी खास निर्दिष्ट करून लिखित आदेशाद्वारे शब्द 'खास निर्दिष्ट करून सार्वजनिक सुचना किंवा लेखी आदेशाद्वारे' बदल केले आहेत.

++ शासन अधिसुचना दि.२९/०५/१९७३ खंड ४२ (१) मध्ये 'ही योजना चालविण्याची किंमत' या शब्दानंतर 'आणि नोंदणीकृत कामगारांना वेगवेगळे फायदे सोयी आणि सुविधा पुरविण्यासाठी असे शब्द घातले आहेत.

+++ शासन अधिसुचना दि.२९/०५/१९७३ खंड ४२ (१) मध्ये 'खास लिखित आदेशाद्वारे निर्दिष्ट करा' शब्दांसाठी खास सार्वजनिक सुचना किंवा लेखी आदेशाद्वारे निर्दिष्ट करा शब्द बदलेले आहेत.

XX शासन अधिसुचना दि.२९/०५/१९७३ खंड ४२ (२) वगळण्यात आले आहे.

१ आणि २ १९७४ चा शासन अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४२ (३) मध्ये 'अंदाजित' शब्द 'दैनंदिन वेळ दर मजूरीच्या आधारे गणना केलेले' शब्द वगळण्यात आले आहेत.

XXX शासन अधिसुचना युडब्ल्युए १४७१/ दि.२९/०५/१९७३ अन्वये खंड ४२ (३)मध्ये 'पन्नास टक्के' शब्दासाठी 'तीस टक्के' शब्द बदलले आहेत.

---

## ४३)भविष्य निर्वाह निधी आणि उपदान -

(१) मंडळ * हे नोंदणी झालेल्या कामगारांकरीता अंशदायी भविष्य निर्वाह निधीसाठी नियम तयार करील आणि नियमांचे कार्यानवयन करील.** हे नियम, आवश्यक असे अंशदानाचा दर, प्रदानाची रीत व पध्दती यांची तरतुद करतील.+ तथापि, असे की अंशदानाचा दर *** नोंदीत कामगारांच्या मजुरीच्या ६.२५ टक्के पेक्षा कमी असणार नाही आणि तो अशा, मजुरीच्या ८.३३ टक्केपेक्षा अधिक असणार नाही. मात्र नियम तयार करेपर्यंत अंशदानाचा दर निश्चित करणे आणि त्याच्या प्रदानाची रीत व पध्दत निश्चित करणे, मंडळाकरीता कायदेशीर असेल. ++

(१)(अ) अंशदायी भविष्य निर्वाह निधीकरीता नियम तयार करताना मंडळ, वेळोवेळी सुधारण्यात आलेला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ आणि

त्याखाली तयार केलेली योजना विचारात घेईल..+++

(२) मंडळ, नोंदीत कामगारांसाठी उपदानाच्या प्रदानाकरीता नियम तयार करील.

(२)(अ) नोंदीत कामगारांसाठी उपदानाच्या प्रदानाकरीता नियम तयार करताना मंडळ, वेळोवेळी सुधारण्यात आलेला उपदान प्रदान अधिनियम,१९७२ च्या तरतुदी विचारात घेईल. ++++

(३) भविष्य निर्वाह निधी आणि उपदान यासाठी मंडळाने तयार केलेले नियम हे राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन असतील.

---

*१९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये 'पूलमधील कामगारांच्या संदर्भात आणि त्यांच्या मासिक कामगारांच्या संदर्भात नोंदणीकृत मालक' या शब्दानंतर वगळण्यात आले.

**१९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड (४३)१ मध्ये 'योगदानी भविष्य निर्वाह' या शब्दानंतर 'निधी' शब्द नोंदणीकृत कामगारांसाठी जोडला गेला.

*** १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४३(१) मध्ये 'कामगार आणि मालकाकडून' शब्द वगळण्यात आला.

+१९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४३(१) मध्ये 'आवश्यक मानल्या जातील तसे' शब्दानंतर शब्द आणि आकडे 'म्हणून तरी योगदानाचा दर नोंदणीकृत कामगारांच्या मजूरीच्या ६.२५% पेक्षा कमी आहे आणि ८.३३% पेक्षा जास्त नाही' समाविष्ट करण्यात आला.

++ १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४३(१) तरतुदीसाठी खालील तरतुद बदलली आहे.

परंतू नियम तयार होईपर्यंत मंडळाला योगदानाचा दर आणि त्याची रीत आणि रक्कम अदा करण्याची पध्दत निश्चित करणे कायदेशीर असेल.

+++१९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४३मध्ये उपखंड (१) नंतर, उपखंड (१अ) समाविष्ट केला आहे.

++++ १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम एक्सएल अन्वये खंड ४३ मध्ये उपखंड (२) उपखंड (२अ) नंतर समाविष्ट केले आहे.

---

## ४४) दंड-

जो कोणी खंड १४, १४- अ, ३० आणि ३१ च्या तरतुदीचे उल्लंघन करील त्याला, जेथे असे उल्लंघन हे प्रथम उल्लंघन असेल तेथे अपराधसिध्दी *नंतर तीन महिन्यांचा कारावास किंवा ५००/- रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होईल ** जैथे असे उल्लंघन कोणतेही नंतरचे उल्लंघन असेल तेथे त्याला ६ महिन्याचा कारावास किंवा १००० रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होईल.*** जर अपराधसिध्दीनंतर उल्लंघन पुढे चालू राहिले तर त्याला असे उल्लंघन ज्या ज्या दिवशी चालू राहिले त्या

त्या प्रत्येक दिवसासाठी रु. १००/- इतक्या जादा दंडाची शिक्षा होईल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. युडब्लूए १४७१ (जीएल)/१७३६४१/ कामगार-४ दि. २९/०५/१९७३ अन्वये योजनेला संलग्न अनुसूचि वगळण्यात आली आहे.

---

मुळ खंड ४४ दंड:-

जो कोणी खंड १४,३०,३१ च्या तरतुदीचे उल्लंघन करेल, तो दोषी आढळल्यास पाचशे रूपयापर्यंतच्या दंडास पात्र असेल.

(शासन अधिसुचना क्र.युडब्लूए १०७४/१०१७२४/ कामगार-४ दि. १७/०१/१९७५ अन्वये मुळ खंडात खालील परिच्छेद जोडण्यात आला होता.)

‘आणि दोषी ठरल्यानंतरही उल्लंघन सुरू ठेवल्यास ज्या दिवशी हे उल्लंघन सुरू आहे त्याचा प्रत्येक दिवसासाठी अशा आणखी दंडासह शंभर रूपयापर्यंत वाढु शकेल.’

(आणि शेवटी संपूर्ण खंड शासन अधिसुचना क्र. युडब्लूए १४७६ प्र.क्र.६१६/ कामगार-५ दि. १४/०७/१९७७ अन्वये वर दिल्याप्रमाणे बदलेले गेले आहे.)

---

## मालकाच्या नोंदणीचा नमुना
## (कलम १४ पहा)

नोंदणी क्रमांक
(कार्यालयाद्वारे भरण्यात येईल)

१. आस्थापनेचे नाव आणि पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि ज्या दिवशी मालकाने त्याच्या व्यवसायाला किंवा व्यापाराला सुरुवात केली.

२. फर्म अथवा कंपनी —

मालकाचे नाव -

भागीदार १
२

संचालक १
२

३. आपण कुठल्या संघटनेचे सदस्य आहात काय? असल्यास संघटनेचे नाव

४. तुमची आस्थापनेची मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ या कायद्याअंतर्गत नोंदणी झाली आहे काय? असल्यास, नोंदणी क्रमांक

५. तुमच्या आस्थापनेच्या व्यवसाय/व्यापाराशी संबंधित कामे जसे की माल चढवणे, उतरवणे, साठवणे, त्याची थप्पी लावणे, ने-आण करणे, वजन करणे, मापन करणे, भरणे, ही कापड मालासंबंधित सर्व कामे जिथे करण्यात येईल त्या कामाच्या जागेचे तपशील

६. आपण कंत्राटाद्वारे कामगारांची नियुक्ती केली आहे काय? किंवा तशी करण्याचा आपला विचार आहे काय? असल्यास कंत्राटदारांची नावे लिहा.

७. आपण टोळीद्वारे कामगारांची नियुक्ती केली आहे काय? किंवा तशी करण्याचा आपला विचार आहे काय? असल्यास टोळींची नावे

तारीख:

ठिकाण: अर्जदाराची सही